ब प्रत्रक

| अ. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | मिरज लोहमार्ग पोलीस ठाणे जि. पुणे लोहमार्ग |
| २ | गुन्हा र. नं. व कलम | ९०/२०२२, कलम ३५४ अ (१), ३२३ भा.दं.वि.सह अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा सन १९८९ चे कलम ३(१)(आर) |
| ३ | फिर्यादीचे नांव व पत्ता | चंद्रकांत जब्बर जाडकर वय ४७ वर्षे धंदा– यंत्रमाग कामकार रा. आसरा नगर सांगली रोड मु.पो. इचलकरंजी जि. कोल्हापूर मो. नं. ९०७५६३१९७३ |
| ४ | आरोपी | प्रविण सुखदेव घाडगे वय ३२ वर्षे धंदा रेल्वे टि.सी. नेमणूक मिरज रा. घाडगे वस्ती मु.पो.टाकळी ता. माढा जि. सोलापूर सध्या रा. मिरज रेल्वे स्टेशन रेस्ट हाउस |
| ५ | गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण | दिनांक २५/१२/२०२२ रोजी दुपारी १६.०० ते १६.३० वा. दरम्यान परळी – मिरज पॅसेंजर गाडीचे मागील जनरल डब्यात कवठे महाकांळ ते सलगरे रेल्वे स्टेशन दरम्यान चालू गाडीत. |
| ६ | गुन्हा उशीरा दाखल कारण | गुन्हयातील पीडीतावर औषध उपचार झाले नंतर फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने विलंब झाला आहे. |
| ७ | गुन्हा दाखल ता. वेळ | दिनांक २६/१२/२०२२ रोजी ००.५२ वा. |
| ८ | गुन्हयातील पीडीत इसमांची नावे पत्ते | १ चंद्रकांत जब्बर जाडकर वय ४७ वर्षे – फिर्यादी<br>२ रेखा चंद्रकांत जाडकर वय ४२ वर्षे–फिर्यादी यांची पत्नी<br>३.अंजली चंद्रकांत जाडकर वय १९ वर्षे फिर्यादी यांची मुलगी रा.सर्व आसरा नगर सांगली रोड मु.पो. इचलकरंजी जि. कोल्हापूर |
| ९ | जखमी इसमांची वैद्यकीय तपासणी झाली काय | होय मिरज सिव्हील हॉस्पीटल येथे एम.एल.सी.नं. ७१७४, ७१७५/२०२२ दि. २५/१२/२०२२ |
| १० | पो. ठाणे पासुन घटनास्थळाचे अंतर व दिशा | पो. ठाणे पासुन पुर्वेस ५० किलोमीटर. |
| ११ | दाखल अंमलदार | पो.ना. १४ कुंभार |
| १२ | तपासी अंमलदार | **सपोनि पाटोळे तपास हस्तांतर चंद्रकांत भोसले उप विभागीय पोलीस अधिकारी** |
| १३ | हकीकत | गुन्हयातील फिर्यादी हे यंत्रमाग कामगार म्हणून इचलकरंजी जि. कोल्हापूर या ठिकाणी काम करतांत. ते दिनांक २४/१२/२०२२ रोजी त्यांचे नातेवाईक मुलीच्या वाढदिवसा करीता सांगोला जि.सोलापूर येथे त्यांची पत्नी व मुलीसोबत गेले होते. तेथील वाढदिवस झाले नंतर पुन्हा इंचलकरंजी जि. कोल्हापूर येथे जाणेसाठी परळी मिरज या गाडीने दिनांक २५/१२/२०२२ रोजी प्रवास करीत असतांना गुन्हयातील आरोपी हा फिर्यादी व त्यांचे कुटूंब बसले ठिकाणी आला. मी रेल्वेचा कर्मचारी असतांना मला जागा देत नाही. असे म्हणून आरोपीने आपले जवळील बॅग फिर्यादी यांची मुंलगी बसले ठिकाणी ठेवली व फिर्यादी यांचे मुली शेजारी खेटून बसला व फिर्यादी यांचे मुलीकडे वाईट नजरेनें बघू लागला. म्हणून फिर्यादी यांनी आरोपीला जवळ ठेवलेली बॅग बाजूला ठेवा व उठून बाजूला बसा असे सांगीतले असता,आरोपीने रागाने फिर्यादी यांना ढकलून दिले त्यामुळे फिर्यादी हे खाली पडले नंतर आरोपी हा फिर्यादी यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करू लागला. म्हणून फिर्यादी यांची पत्नी आडवी आली असता आरोपीने फिर्यादी यांचे पत्नीस ढकलून दिलेने त्या बाजूच्या बाकडयावर पडल्या. त्यांचा चष्मा तुटला.त्यांचे उजवे हाताचे दंडावर खरचटले. म्हणून फिर्यादी यांनी दिले तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>फिर्यादी व त्यांची पिडीत मुलगी यांचा मे.न्यायालयासमोर सीआरपीसी कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. त्यात फिर्यादी व त्यांचे पिडीत मुलीस यातील आरोपीने जातीवाचक अवमानकारक उल्लेख केलेने अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा सन १९८९ चे कलम ३(१)(आर) चे उल्लंघन झाले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आलेने दि. ०४/०१/२०२३ रोजी गुन्हयामध्ये कलम वाढ केली आहे. |
| १४ | सद्यस्थिती | तपासावर |